CNRMHAH1900 1679 2022

रे मु नं. ४३६/२०२२ मध्ये नि. १८ वर आदेश
( काशिनाथ विश्वनाथ बुधवंत विरुध्द भामाबाई विश्वनाथ बुधवंत )

१. सदरचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर ६ रुल १७ प्रमाणे दाखल केला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, वादीने सदरचा दावा वाटप, कब्जा व निरंतर ताकिदीसाठी दाखल केला आहे. सदर दाव्यामध्ये टायटल कॉलममध्ये हिंदू कायदा कलम ६ अन्वये सरस निरस मानाने वाटून विभागून कब्जेत मिळणसोठी व स्पेसिफीक रिलीफ अॅक्ट १९६३ कलम ३७,३८ प्रमाणे निरंतर ताकिद हुकूमासाठी याऐवजी हिंदू कायदा कलम ६ अन्वये सरस निरस मानाने वाटून विभागून कब्जेत मिळणसोठी व स्पेसिफीक रिलीफ अॅक्ट १९६३ कलम ३७,३८ प्रमाणे निरंतर ताकिद हुकूमासाठी व जाहीर ठरावासाठी अशी दुरुस्ती करण्याची परवानगी मागितली आहे. तसेच प्रतिवादी क्र १ ने दि.०४.०४.२०२२ रोजी दस्त क्र १४९२/२०२२ ने अमोल रामदास बुधवंत यांचे हक्कामध्ये बक्षीसपत्राचा दस्त करुन दिला. सबब त्यांना दाव्यात सामील करणे गरजेचे आहे. तरी प्रतिवादी क्र ५ चे खाली

- ६. अमोल रामदास बुधवंत, वय २९ वर्षे, धंदा शेती, रा. नांदूरविहीरे, ता.शेवगाव यास सामील करण्यात यावे.
- तसेच दाव्याचे कामकाज चालू असताना प्रतिवादी क्र १ ने तिचे हक्कातील जमीन बक्षीसपत्राने अमोल रामदास बुधवंत यांना करुन दिल्यामूळे खालीलप्रमाणे दुरुस्ती करणे गरजेचे आहे.

| अ.नं. | ग नं. | क्षेत्र हे आर | आकार रु.पै | चतुःसीमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पूर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
| ३ | १८/१ | ०.८१ | ०.८५ | बाबूलाल शेख यांची जमीन | गट नं १८/१/२ पैकी निता ढाकणे याची | राजेंद्र बडे यांची जमीन | शेषराव वनवे यांची जमीन |

- तसेच दावा कलम ५चे खाली ५अ. टाकून त्यात पुढीलप्रमाणे मजकूर टाकण्यात यावा. ५अ. सदरचे दाव्यातील प्रतिवादी क्र १ ........ कोर्टामध्ये दाखल केलेला आहे.
- तसेच वादीचे दावा कलम ११ मधील विनंती कॉलम अ चे खाली अ१ म्हणून दुरुस्ती

करण्यात यावी. अ१. सदरचे दाव्यातील प्रतिवादी क्र १ ....... जाहीर ठरावा व्हावा ही विनंती.

येणेप्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी असे वादीचे म्हणणे आहे. वरील प्रमाणे दुरुस्ती केल्यास दाव्याचे स्वरुपात कोणताही बदल होत नाही. दुरुस्ती न केल्यास वादीचे मोठे नुकसान होईल. सबब अर्ज मंजूर करण्यात यावा.

३. प्रतिवादींनी अर्जाला नि.२२ वर म्हणणे दिले की, अर्ज कबूल नाही, अर्जातील कथने खोटी व बनावट आहेत. वादीने मागितलेली दुरुस्ती मंजूर झाल्यास दाव्याचे स्वरुपामध्ये बदल होणार आहे. वादीचा अर्ज मुदतीत नाही. सबब वादीचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा.

४. वादी प्रतिवादींचा युक्तीवाद ऐकला. वादीतर्फे विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की वादीने त्याच्या दाव्यात सूचविलेली दुरुस्ती ही न्याय्य व कायदेशीर आहे. सदरची दुरुस्ती आवश्यक असून त्यामुळे दाव्याचे स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. सदर दुरुस्तीमुळे दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्यास मदत होणार आहे. प्रतिवादींचे वकिलांनी असा युक्तीवाद केला की सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या मूळ स्वरुपात बदल होणार आहे. अर्ज नामंजूर करण्यात यावा.

५. मा. सर्वोच्च न्यायालय आणि मा. मुंबई उच्च न्यायालय यांच्या ब-याच न्यायनिर्णयातून असे प्रतिपादीत करण्यात आले आहे की जर प्रस्तावित सुधारणेमूळे विरुध्द बाजूस अन्याय होणार नसेल, दाव्यातील खरे प्रश्न निकालात काढण्याकरता दुरुस्ती आवश्यक असेल तर त्या दुरुस्तीस परवानगी दिली पाहिजे. परंतु नवे वादकारण समाविष्ट करण्यासाठी दावा दुरुस्ती करता येत नाही. प्रस्तुतच्या अर्जात वादीने नमूद केले आहे की सदरचा दावा दाखल केल्यानंतर प्रतिवादी क्र १ ने दावा मिळकतीपैकी क्षेत्र बक्षीसपत्र करुन दिले आहे. सदरचा घटना ही दावा दाखल झाल्यानंतर घडलेली आहे. त्या अनुषंगाने दरम्यानच्या कालावधीमध्ये घडामोडी रेकॉर्डवर येणे व दाव्यात त्याबाबत दुरुस्ती होणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने दुरुस्ती करण्यास परवानगी मिळणे न्यायाच्या दृष्टीकोनातून गरजेचे आहे. प्रतिवादी क्र १ ने करुन दिलेल्या बक्षीसपत्रामूळे दावा मिळकतीचे टायटल मध्ये देखील बदल होतो व त्याअनुषंगाने दुरुस्ती होणे कायद्याने गरजेचे आहे.

६. अर्जामध्ये नमूद दुरुस्तीचे अवलोकन केले असता सदरच्या दुरुस्तीस परवानगी दिल्यास नवे वादकारण निर्माण होईल असे मला वाटत नाही. सदर अर्जामध्ये वादीने नमूद केल्याप्रमाणे दावा दाखल झाल्यानंतर घडलेल्या घटनाक्रमाचा उल्लेख करणे दाव्यामध्ये गरजेचे आहे. दावा दाखल झाल्यानंतर घडलेल्या घडामोडी रेकॉर्डवर आणण्यासाठी सदरची दुरुस्ती करण्याचे कारण वादीला घडलेले आहे. त्यामुळे वादीने योग्य ती खबरदारी घेउन सुध्दा न्याय चौकशी सुरु होण्यापूर्वी सदरच्या अर्जात नमूद केलेली दुरुस्ती मधील बाब पुढे त्यांना का आणता आली नाही याचे स्पष्टीकरणे दिलेले आहे. सदरच्या दुरुस्तीने न्यायनिर्णयात दाव्यातील खरा वाद सोडवण्यात मदत होइल. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. अर्ज रक्कम रु. २००/- कॉस्ट आकारुन मंजूर करण्यात आला.

२. वादीने सदरची दुरुस्ती आदेशापासून १४ दिवसात करावी.

SANJANA UDAY JAGUSTE Digitally signed by SANJANA UDAY JAGUSTE Date: 2023.08.29 17:45:51 +0530

दि. २९/०८/२०२३ (एस. यू. जागुष्टे)
शेवगाव दिवाणी न्यायाधीश क. स्तर, शेवगाव